शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे रिक्त पदांची भरती वैयक्तीक मान्यता, पदोन्नती व अनुषंगिक बाबींसंदर्भात.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एसएसएन २०१४/(१/१४)/टीएनटी-२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ:- १) शासन निर्णय क्रमांक :- एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२, दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१२
२) शासन निर्णय क्रमांक :- एसएसएन-२०१४/(१/१४)/टीएनटी-२, दिनांक २० जून,२०१४.

शासन निर्णय :-

संदर्भाधिन शासन निर्णयातील मधील अनुक्रमांक दोन ड (५) रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

दोन ड (५) "त्यानुसार रिक्त पदे निश्चित झाली की खाजगी संस्थांना पदे भरण्यासाठी जाहिरात काढण्यास मान्यता देणे, अशी मान्यता देतांना जाहिरातीमध्ये पद कोणत्या प्रवर्गासाठी आहे याचा तपशील, पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता (माध्यम व विषयासह), वयोमर्यादा, पद पूर्णवेळ /अर्धवेळ यापैकी कोणते आहे याचा तपशील, पद अनुदानित / अंशत: अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित असल्याचा तपशील, पदाचे मानधन / वेतनश्रेणी, पदासाठी उपलब्ध कार्यभार, या अटी शर्ती घालून जाहिरात प्रस्तावित केली असल्याची खात्री करुन घेणे व त्यानंतर जाहिरात काढण्यास परवानगी देणे."

२. घडयाळी तास/रजा कालावधीसाठी पदांवर नियुक्ती करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना उक्त समितीच्या परवानगीची आवश्यकता नाही. अशा नियुक्ती करिता शासन निर्णय दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१२ मधील तरतुदीनुसार संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक / शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घ्यावी. अशा नियुक्तीचा कालावधी एक महिन्यापेक्षा आधिक असावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११०७१३२०४५७९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.11.07 13:09:22 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), मंत्रालय, मुंबई

२. मा. प्रधान सचिव /सचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २ , मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ /२, मुंबई/नागपूर.
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.स्थानिक निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२.वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे
१३.सर्व जिल्हा कोषागारे अधिकारी
१४.सहसचिव/उपसचिव (प्रशासन/शिक्षक/विद्यार्थी विकास/अर्थसंकल्प/शाळा व्यवस्थापन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)/प्राथमिक/प्रौढ व अल्पसंख्यांक / SCERT /महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१७. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर)
१८. शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम
१९. सर्व अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक/माध्यमिक)
२०. वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई
२१. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. निवड नस्ती, टीएनटी-२.